## (3) काळ (Tense)

प्रत्येक भाषेत वर्तमान, भूतकाळ, भविष्यकाळ असले तरीही प्राकृतमध्ये वर्तमानकाळ आणि भविष्यकाळाचाच अधिक वापर होत असलेला दिसून येतो. प्राकृत भाषेत भूतकाळ फार कमी प्रमाणात वापरला जात असलेला दिसून येतो.

### 1) वर्तमानकाळाचे प्रत्यय (Present Tense)

1) अर्धमागधी – प्राकृत भाषेत मूळ क्रियांना काळाचे प्रत्यय जोडून क्रियापदाची विविध रूपे तयार केली जातात. त्याला धातुसाधिते म्हणून संबोधले जाते.

2) धातूचे (1)अ, (2) आ, ए, ओकारांत असे दोन गट, विभाग आलेले दिसून येतात.

3) धातूच्या अन्त्य अक्षराच्या उच्चारामधून कोणत्या स्वराचा उच्चार होतो त्यावरून त्या धातूचे वर्गीकरण, गट पाडलेले दिसून येतात. उदा. सुण (यातील अंत्य 'ण'च्या उच्चारातून 'अ' स्वराचा उच्चार होतो म्हणून) हा धातू अकारान्त आहे.

**भण** 'अ'कारान्त धातू आहे.

**गा** (याच्या उच्चारात 'आ'स्वर आहे म्हणून) आकारान्त धातू आहे.

**जा** – आकारान्त धातू

**दे** – एकारान्त धातू

**ने** – एकारान्त धातू

**हो** – ओकारान्त धातू

वरील धातूंना वर्तमान, भूतकाळ, भविष्यकाळाचे प्रत्यय जोडून क्रियापदाचे रूप तयार केले जाते.

## 1) वर्तमानकाळाचे प्रत्यय

**नियम –**

1) फक्त अकारान्त धातूलाच वर्तमानकाळाचे प्रथम पुरुषाचे प्रत्यय जोडतेवेळी अकारान्ताचे आकारान्तामध्ये (अ = आ) रूपांतर करून नंतर वर्तमानकाळाचे प्रत्यय जोडले जातात. (मात्र इतर धातूंना नाही)

उदा. पास = पासा = पासामि

### वर्तमानकाळाचे प्रत्यय (परस्मैपदी)

| पुरुष | ए. व. | अ. व. |
|---|---|---|
| प्रथम पुरुष | मि (आहे) | मो (आहोत) |
| द्वितीय पुरुष | सि (आहेस) | ह (आहात) |
| तृतीय पुरुष | इ (आहे) | अन्ति/न्ति (आहेत) |

### पास (अकारान्त धातू चालविणे)

| प्र. पु. | पासामि (पहातो) | पासामो (पहातो) |
|---|---|---|
| द्वि. पु. | पाससि (पहातोस) | पासह (पहाता) |
| तृ. पु. | पासइ (पहातो) | पासन्ति (पाहतात) |

**सूचना :–** भण, सुण, खण, पढ, गच्छ, रम, इ. सर्व अकारान्त धातू वरील पास या धातुप्रमाणे चालतात.

| जा (आकारन्त धातू) | | | | दे (एकारन्त धातू) | | |
|---|---|---|---|---|---|---|
| प्र. पु. | जामि | जामो | | | देमि | देमो |
| द्वि. पु. | जासि | जाह | | | देसि | देह |
| तृ. पु. | जाइ | जायन्ति | | | देइ | देन्ति |

## 2) भविष्यकाळाचे प्रत्यय

**नियम –**

1) भविष्यकाळाच्या प्रत्ययामध्ये ‘स्स’ चा वापर केलेला असतो.

2) वर्तमानकाळाच्या प्रत्ययाच्या अगोदर ‘स्स’चा वापर केला की भविष्यकाळाचे प्रत्यय तयार होतात. (उदा. स्सामि, स्सामो)

3) फक्त अकारान्त धातूला भविष्यकाळाचे प्रत्यय लावण्यापूर्वी ‘अ’चे इकारांतामध्ये रूपांतर केले जाते. (परंतु इतर धातूंना कोणताही बदल न करता प्रत्यय जोडले जातात.)

4) भविष्यकाळाचे प्रत्यय दोन प्रकारचे आहेत.

| 1) पहिल्या गटाचे प्रत्यय | | | पास धातू चालविणे. | |
|---|---|---|---|---|
| पुरुष | ए.व. | अ.व. | ए. व. | अ.व. |
| प्र.पु. | स्सं, स्सामि | स्सामो | पासिस्सं, पासिस्सामि | पासिस्सामो |
| द्वि.पु. | स्ससि | स्सह | पासिस्ससि | पासिस्सह |
| तृ. पु. | स्सइ | स्सन्ति | पासिस्सइ | पासिस्सन्ति |

**सूचना :–** भण, सुण, खण, पढ, रम, कर इ. धातू वरीलप्रमाणे चालतात.

| ‘जा’ आकारन्त धातू चालविणे. | | | ‘दे’ एकारन्त धातू चालविणे. | |
|---|---|---|---|---|
| प्र.पु. | जास्सं, जास्सामि | जास्सामो | देस्सं, देस्सामि | देस्सामो |
| द्वि.पु. | जास्ससि | जास्सह | देस्ससि | देस्सह |
| तृ. पु. | जास्सइ | जास्संति | देस्सइ | देस्संति |

**सूचना :–** (गा, खा,ने, घे, दे, हो या धातूंना वरीलप्रमाणे (कोणताही बदल न होता सरळ) प्रत्यय लावून भविष्यकाळाची रूपे तयार केली जातात.)

**दुसऱ्या गटाचे भविष्यकाळाचे प्रत्यय**

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | हामि, हिमि | हामो,हिमो |
| द्वि.पु. | हिसि | हिह |
| तृ. पु. | हिइ | हिन्ति |

(**सूचना :–** फक्त अकारान्त धातूचे इकारान्तामध्ये रूपांतर करून प्रत्यय जोडले जातात.)

## 3) भूतकाळाचे प्रत्यय

1) अर्धमागधी– प्राकृतमध्ये भूतकाळाचा अत्यंत कमी प्रमाणात उपयोग केला जातो.

2) भूतकाळाऐवजी बऱ्याच वेळा वर्तमानकाळाचाच अधिक वापर केलेला दिसून येतो.

3) भूतकाळ एकवचनामध्ये सर्व पुरुषांमध्ये ‘इत्था’ आणि अनेक वचनातील सर्व पुरुषांमध्ये ‘इंसु’ हे दोन प्रत्ययच आहेत.

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | इत्था | इंसु |
| द्वि.पु. | इत्था | इंसु |
| तृ. पु. | इत्था | इंसु |

उदा. – भासित्था, गच्छित्था, गच्छिंसु, भक्खिंसु

1) वरील प्रत्यया शिवाय 'ईअ'हा प्रत्यय अकारांत धातूला लावूनही भूतकाळाची रूपे तयार करतात.

उदा. पुच्छ + ईअ = पुच्छीअ  पास = पासीअ

हण = हणीअ  खाण = खणीअ

2) अकारान्तेतर म्हणजे आ, ए, ओ या धातूंना 'सी, ही. हीअ' इत्यादी प्रत्यय लावून भूतकाळी रूपे तयार करतात.

उदा. जा = जासी, जाही, जाहीअ  खा = खासी, खाही, खाहीअ

दे = देसी, देही, देहीअ  हो = होसी, होही, होहीअ

3) भूतकाळाची अनियमित रूपे : आसि, आसी

उदा. वय = वयासि, वयासी

## 4) आज्ञार्थाचे प्रत्यय

1) आज्ञा, हुकूम, विनंती करतेवेळी आज्ञार्थाचा उपयोग केला जातो.

2) आज्ञार्थाच्या प्रत्ययात 'उकार' जास्त असतो.

3) फक्त अकारान्त धातूला 'मु, मो, हि,' हे आज्ञार्थाचे प्रत्यय लावतेवेळी अकाराचे आकारान्तमध्ये रूपांतर करून नंतर प्रत्यय जोडले जातात.

4) केव्हा केव्हा द्वि, पु. ए. वचनामध्ये अकारान्त धातूचे मूळरूप वापरले तर चालते. ते समजण्यासाठी द्वि. पु. ए. वचनामध्ये o या चिन्हाचा उपयोग करतात.

**आज्ञार्थाचे प्रत्यय**

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | मु | मो |
| द्वि. पु. | o, सु,हि, | ह |
| तृ. पु. | उ | अन्तु |

### ‘पास’ अकारान्त धातू चालविणे

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | पासामु | पासामो |
| द्वि. पु. | पास, पाससु, पासहि | पासह |
| तृ. पु. | पासउ | पासन्तु |

(**सूचना :–** भण, सुण, खण, रम, कर, हस इ. अकारान्त धातूंची रूपे वरीलप्रमाणे चालतात.)

### ‘जा’ आकारान्त धातू चालविणे

| पुरुष | ए.व. | अ.व. |
|---|---|---|
| प्र.पु. | जामु | जामो |
| द्वि. पु. | जा, जासु, जाहि | जाह |
| तृ. पु. | जाउ | जायन्तु, जान्तु |

## 5) ल्यबन्ताचे प्रत्यय (संबंध कृदन्त)

1) जेव्हा वाक्यात करून, घेऊन, खाऊन, येऊन, अशा क्रियापदाचा उपोयग करून दोन वाक्ये जोडली जातात तेव्हा ल्यबन्ताचा (संबंधकृदन्ताचा) उपयोग केला जातो.

2) ल्यबंतामध्ये एकवचन, अनेकवचन, तसेच प्रथम पुरुष, द्वितीय पुरुष, तृतीय पुरुष यांचाही वापर केला जात नाही.

3) फक्त अकारांत धातूलाच ‘इऊण’ हा प्रत्यय लावून ल्यबंताचे रूप तयार केले जाते.

उदा. पास + इऊण = पासिऊण भण = भणिऊण

सुण = सुणिऊण. खण = खणिऊण पढ = पढिऊण

उदा. राम आंबा खाऊन घरी गेला.

रामो आमं भक्खिऊण (खाऊण) गेहं गच्छइ।

4) ‘आ, ए, ओ’ या धातूंनाच फक्त ‘ऊण’ प्रत्यय जोडून ल्यबन्ताचे रूप तयार केले जाते.

जा + ऊण = जाऊण खा = खाऊण, गा = गाऊण,

दे = देऊण, घे = घेऊण, ने = नेऊण,

हो = होऊण

5) वरील प्रत्ययाशिवाय ‘इत्ता, एत्ता, इत्ताण, एत्ताण’या प्रत्ययांचाही उपयोग केला जातो.

## 6) तुमंताचे प्रत्यय (हेत्वर्थ कृदन्त)

1) तुमंताचा उपयोग 'साठी, करिता' इत्यादी अर्थाने केला जातो.

2) तुमंतामध्येही वचन आणि पुरुष नाहीत.

3) पास +इउं = पासिउं, भण= भणिउं, सुण = सुणिउं, कर = करिउं, पढ = पढिउं, खण = खणिउं

4) 'आ, ए, ओ या धातूंना 'उं' हा प्रत्यय लावून तुमंताचे रूप तयार केले जाते.
जा =जाउं, गा = गाउं, खा= खाउं, दे = देउं, घे = घेउं, ने = नेउं, हो = होउं
उदा. राम आंबा खाण्यासाठी बागेत गेला.